# तिसावा दीक्षांत समारंभ

## दि. ४ मार्च २०१४

## मा. कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके यांचे प्रास्ताविकपर भाषण

उपस्थित सर्वांना नमस्कार!

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या तिसाव्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख अतिथी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. श्री. सुधीर ठाकरे, समारंभास उपस्थित संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सर्व माजी कुलगुरू, अधिसभा, व्यवस्थापन व विद्वत परिषदेचे सर्व आजी-माजी सन्माननीय सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, विविध प्राधिकरणांचे सदस्य, उपस्थित लोकप्रतिनिधी, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षणप्रेमी नागरिक, पत्रकार बंधू आणि विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो!

विदर्भाच्या पावन भूमीत आणि कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या या अंबानगरीत विद्यापीठाच्या तिसाव्या दीक्षांत समारंभात कुलगुरू म्हणून मी आपणा सर्वांचे सहर्ष स्वागत करतो.

मित्रहो, आजच्या दीक्षांत समारंभास लाभलेले प्रमुख अतिथी श्री. सुधीर डी. ठाकरे हे आय. ए. एस. अधिकारी असून दूरदृष्टीचे प्रशासक आहेत. प्रशासन लोकाभिमुख करणारे अधिकारी म्हणून त्यांचा लौकिक आहे. आपल्या कारकीर्दीत त्यांनी ग्रामविकासात मोलाची भर घातली असून सध्या ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष आहेत.

श्री. सुधीर ठाकरे हे मुळात विज्ञानाचे पदवीधर असून त्यांनी पदार्थविज्ञानात आपले पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. लोकप्रशासन या विषयातील पदव्युत्तर पदवी आणि कायद्याची पदवीही त्यांनी प्राप्त केली आहे. श्री. ठाकरे यांनी पदार्थविज्ञानाचे व्याख्याता म्हणून आपल्या सेवेला प्रारंभ केला. पुढे विविध प्रशासकीय परीक्षेत यशस्वी होत आय. ए. एस. ही सर्वोच्च प्रशासकीय परीक्षाही त्यांनी उत्तीर्ण केली. त्यानंतर प्रशासनातील विविध पदे भूषविली. १९९९ ते २००१ या कालावधीत सिंधुदुर्ग जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, २००४ ते २००७ या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिव कार्यालयातील सचिव, २००८ ते २००९ या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे सचिव, २००९ ते २०१२ या कालावधीत

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीण विकास आणि पंचायती राज विभागाचे सचिव इत्यादी महत्त्वाची पदे भूषवित त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. २०१२ पासून ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या कारकीर्दीत महत्त्वाच्या योजनांना चालना मिळाली. त्यातील काही ठळक बाबी सागंता येतील :

१) महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील स्वच्छतेसाठी गाजलेले 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान' आणि 'राष्ट्रीय संत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा' या योजनांचे संपूर्ण नियोजन व अंमलबजावणी यांमध्ये त्यांचा मोलाचा सहभाग राहिला आहे. ग्रामीण स्वच्छतेसाठी संपूर्ण जगात राबविल्या गेलेली सर्वात मोठी मोहिम म्हणून जागतिक बँक आणि युनिसेफ यांनी या प्रकल्पाची नोंद घेतली.

२) सहकार व वस्त्रोद्योग विभागात त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

३) कापूस पणन महासंघाच्या सह-कार्यकारी संचालक पदावर श्री. सुधीर ठाकरे हे कार्यरत असताना महासंघ सतत दोन वर्षे भरघोस नफ्यात होता.

४) जिल्हापरिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींमध्ये महिला आरक्षणाचे प्रमाण ३० ते ५० टक्के वाढविण्याचा शासनाचा निर्णय त्यांच्या कारकीर्दीतच झाला तसेच त्यांच्या कारकीर्दीत महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींमध्ये संपूर्ण संगणकीकरणाचा प्रकल्प सुरू झाला.

५) राज्यात जलस्वराज्य, स्वजलधारा या योजना राबविण्यात श्री. ठाकरे यांचा प्रशासकीय अधिकारी म्हणून महत्त्वाचा वाटा आहे.

६) ग्रामपंचायतींना शासनाकडून कामगिरीवर आधारित मुक्त विकास निधी देण्याची 'पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना' त्यांच्या कारकीर्दीतच सुरू झाली.

असे हे ग्रामविकासाच्या तळमळीने कार्य करणारे कुशल प्रशासक श्री. सुधीर ठाकरे आजच्या दीक्षांत समारंभाचे मान्यवर अतिथी म्हणून आपल्याला लाभले, ही अतिशय आनंदाची बाब आहे. त्यांचे मी मनापासून स्वागत करतो.

मित्रहो, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची स्थापना दि. १ मे १९८३ रोजी झाली. शिक्षण, संशोधन, विकास आणि विस्तार या चतुःसूत्रीवर भर देत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ गेली ३० वर्षे विविध शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयांच्या माध्यमातून ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहे. विद्यार्थी हा या विद्यापीठाचा केंद्रवर्ती घटक आहे. त्यांच्यासाठी उत्तम शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध करणे व त्यांना ज्ञानसंपन्न करणे हे

विद्यापीठाचे आद्य कर्तव्य आहे. या भावनेतूनच विद्यापीठ वाटचाल करीत आहे.

आज संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांची संख्या **४१४** झाली असून त्यापैकी **१२३** महाविद्यालये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 2 (f) / 12 (B) सूचीमध्ये समाविष्ट झालेली आहेत. विद्यापीठाच्या अंतर्गत नऊ विद्याशाखांच्या माध्यमातून पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केले जातात. विद्यापीठाच्या २०१४ च्या उन्हाळी परीक्षेमध्ये विविध विद्याशाखांमधील एकूण ६५० परीक्षांना, अंदाजे २,६२,००० परीक्षार्थी प्रवेशित आहेत. आजच्या दीक्षांत समारंभामध्ये विविध विद्याशाखांमधील २४३ संशोधकांना आचार्य पदवी प्रदान करण्यात आली आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आज संपन्न होत असलेल्या तिसाव्या दीक्षांत समारंभामध्ये **९६ सुवर्णपदके, २२ रौप्यपदके आणि २४ रोख पारितोषिकांचे** वितरण करण्यात आले. यामध्ये तिसाव्या दीक्षांत समारंभापासून नव्याने सुरू होणाऱ्या पारितोषिकांमध्ये पाच सुवर्ण पदके व एक रोख पारितोषिक यांचा समावेश आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या बाराव्या योजनेमध्ये विद्यापीठाला शैक्षणिक विकासासाठी रु. १३.९९ कोटी अनुदान मंजूर झाले असून आतापर्यंत रु. ५ कोटी ५९ लाख ६० हजार एवढे अनुदान विद्यापीठाला प्राप्त झाले असून त्यासंबंधीची कार्यवाही प्रगतिपथावर आहे.

यावर्षी विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्रामार्फत एम. ए. (जेंडर ॲंड वुमेन स्टडीज) हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या इनोव्हेटिव्ह प्रोग्राम्स अंतर्गत भूगर्भशास्त्र विभागास 'रिमोट सेन्सींग ॲंड जीआयएस'मधील पी. जी. डिप्लोमा तर भौतिकशास्त्र विभागास फोटोनिक्समधील पी. जी. डिप्लोमा सुरू करण्यासाठी अनुदान प्राप्त झाले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये यावर्षापासून युजीसी-नेट परीक्षा केंद्र सुरू करण्यास मंजूरी दिली. दि. २९ डिसेंबर २०१३ रोजी युजीसी-नेट परीक्षेचे आयोजन करून विद्यापीठाने या केंद्राची मुहूर्तमेढ रोवली.

विद्यापीठ अधिसभा व व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठ श्रोतृगृहाला प्रथम कुलगुरू डॉ. के. जी. देशमुख यांचे नाव देण्याचा ठराव पारित केला व त्यानुसार श्रोतृगृहाचे नामकरण झाल्याने हे सभागृह आता 'डॉ. के. जी. देशमुख सभागृह' या नावाने ओळखल्या जाणार आहे. डॉ. के. जी. देशमुख यांचे उत्तम नेतृत्व, दूरदृष्टी, शिस्तबद्ध कार्य यांपासून विद्यापीठातील प्रत्येक घटकाला सदैव प्रेरणा मिळेल, असा मला विश्वास आहे.

विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसराचा व येथील सोयी-सुविधांचा निरंतर विकास सुरू

आहे. यावर्षी १.२६ कोटी रुपयांची मुलींच्या वसतिगृहाची इमारत बांधून पूर्ण झाली तसेच ४.५० कोटी रुपयांची तिसऱ्या व चौथ्या टप्प्यांतर्गत भौतिकशास्त्र विभागाची इमारत, ३८ लक्ष रुपयांची विद्यार्थी उपहार गृह इमारत, ५० लक्ष रुपयांची रसायनशास्त्र विभाग इमारत, २५ लक्ष रुपयांची भूगर्भशास्त्र इमारत तसेच २५ लक्ष रुपयांची समाजशास्त्र विभाग इमारत, १ कोटी रुपयांची ॲकॅडेमिक स्टाफ कॉलेज वसतिगृह इमारत इत्यादी बांधकामे पूर्णत्वास येत आहेत. याशिवाय २ कोटी रुपयांचे एम.बी.ए. विभाग इमारत-विस्तारीकरण, ५.१० कोटी रुपयांची संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र इमारत, १८.४२ कोटी रुपयांची मल्टिप्लेक्स इमारत, ४.७८ कोटी रुपयांचे स्पोर्टस कॉम्प्लेक्स, ४.०४ कोटी रुपयांची सुरक्षा भिंत आणि कर्मचारी अतिथीगृह इत्यादी बांधकाम भविष्यात सुरु होणार असून बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजसाठी जमीन संपादनाची कार्यवाही सुरू आहे.

यावर्षी विद्यापीठाच्या विविध विभागांमधील आणि संलग्नित महाविद्यालयांतील संशोधन प्रकल्पांना वेगवेगळ्या संस्थांकडून अनुदान प्राप्त झाले असून संबंधित संशोधनाचे कार्य सुरू आहे. सद्यःस्थितीत विद्यापीठामध्ये १७ विद्यापीठ शिक्षकांचे संशोधन प्रकल्प सुरू असून १६ शिक्षकांचे संशोधन प्रकल्प वेगवेगळ्या वित्तीय संस्थांकडे अर्थसाहाय्यासाठी पाठविण्यात आले आहेत.

विद्यापीठातील आणि संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक तसेच विद्यार्थी यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय तसेच राज्यस्तरावरील चर्चासत्र, परिषद आणि कार्यशाळा यांमधून आपले शोधनिबंध सादर केले आहेत.

संशोधनाला चालना देण्यासाठी विद्यापीठ तसेच संलग्नित महाविद्यालयांमार्फत विविध चर्चासत्र-परिषदांचे आयोजन होते. यावर्षी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागाने दि. ९ नोव्हेंबर २०१३ ते २९ नोव्हेंबर २०१३ या कालावधीत 'बिहेव्हिअर चेंज कंझरव्हेशन कॅम्पेन्स : ए न्यू टूल फॉर स्पेसिज कंझरव्हेशन वीथ फोकस ऑन द टायगर इन इंडिया' या विषयावर आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले. या माध्यमातून वन्यजीव संरक्षणाबरोबरच व्याघ्रसंरक्षणाबद्दल जाणीवजागृती घडविण्याचा प्रयत्न केला. व्यवसाय प्रशासन विभागाने ' रिसर्चेस इन बिहेव्हीअरल सायन्सेस' या विषयावर दि. १७ व १८ ऑक्टोबर २०१३ रोजी अमरावती येथील तक्षशीला महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले. या परिषदेत इराण, इराक, अफगणिस्तान, केन्या, रोमानिया, येमेन,

बहरिन येथील संशोधक सहभागी झालेत. याशिवाय रसायनिक तंत्रज्ञान विभाग, जैवतंत्रज्ञान विभाग, व्यवसाय प्रशासन विभाग, शिक्षणशास्त्र विभाग, मराठी विभाग, स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र, स्त्री अभ्यास केंद्र, बुद्धिस्ट अभ्यास केंद्र या विद्यापीठातील विभागांनी विविध महाविद्यालये व नामांकित संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने चर्चासत्र-परिषद-कार्यशाळा यांचे आयोजन करून संशोधनाचे आदानप्रदान केले. जैवतंत्रज्ञान विभागाने वेबिनॉरचे आयोजन केले.

विद्यापीठाने संशोधनाचे आदानप्रदान व्हावे यासाठी तसेच आपल्या सेवेचा दर्जा अधिक वाढावा यांसाठी देशान्तर्गत आठ नामांकित संस्थांसोबत सामंजस्य करार (M.o.U.) केलेले आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पेनमधील व्हॅलेंशिया विद्यापीठाशी सामंजस्य करार केला आहे. विद्यापीठात रिसर्च व पेटंट सेल कार्यरत असून त्याद्वारे संशोधनक्षेत्रातील शिक्षकांना पेटंट (Patent) मिळविण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे.

विद्यापीठाच्या विविध विभागांमधील तसेच संलग्नित महाविद्यालयातील काही शिक्षकांना शासनाचे पुरस्कार मिळालेले आहेत. महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट रा. से. यो. विद्यापीठ पुरस्कार या विद्यापीठाला मिळाला आहे. यावर्षी केंद्र शासनाचा इंदिरा गांधी राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांना देऊन भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. २०१२-१३ चा महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी पुरस्कार धारणी येथील श्री. वसंतराव नाईक महाविद्यालयातील प्रा. भानुदास देविदासराव जामनेरकर यांना तर उत्कृष्ट रा. से. यो. स्वयंसेवक पुरस्कार पुसद येथील बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयाचा स्वयंसेवक पवन रामदासजी दवंडे याला घोषित झाला आहे. महाराष्ट्र शासनाचा सन २०१२-१३ चा आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार गणित विभागप्रमुख डॉ. किशोर अढाव यांना तर उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीसाठी दिला जाणारा रा. भा. पाटणकर राज्य वाङ्मय पुरस्कार मराठी विभागातील डॉ. हेमंत खडके यांना 'अर्वाचीन कवींचा काव्यविचार' या समीक्षाग्रंथासाठी प्रदान करण्यात आला. शिक्षण विभागप्रमुख डॉ. गजानन गुल्हाने यांना 'संशोधन व संख्याशास्त्र' या पुस्तकासाठी डॉ. आनंद वास्कर पुरस्कार प्राप्त झाला. काही अध्यापकांची विद्यापीठ अनुदान आयोग, केंद्रीय लोक सेवा आयोग आदी संस्थांच्या समित्यांवर तसेच शासकीय आणि निमशासकीय पदांवर नियुक्ती झाली असून ही गोष्ट विद्यापीठाचा नावलौकिक वाढविणारी आहे. या शिक्षकांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा

फायदा त्या त्या संस्थांना निश्चितच होईल, याबद्दल मला खात्री आहे. विद्यापीठातर्फे दि. १ मे २०१३ रोजी विद्यापीठातील तसेच संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांनी दिलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल व योगदानाबद्दल उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार तसेच दि. २ डिसेंबर २०१३ रोजी पर्यावरणसंवर्धन करण्याबद्दल संस्था गटातून आणि वैयक्तिक गटातून पर्यावरण पुरस्कार प्रदान करण्यात आले. दि. २० डिसेंबर २०१३ रोजी गाडगे बाबांच्या विचारानुसार कार्य करणाबद्दल स्व. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रीत्यर्थ 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक पुरस्कार २०१३' विद्यापीठातर्फे ज्येष्ठ समाजसेवक श्री. चुन्नीलालजी मोतीलालजी मंत्री यांना प्रदान करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधीलकीचे अंग विकसित होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून १९५ महाविद्यालयांतून २९२ रासेयो एकक कार्यरत आहेत. रासेयो विद्यार्थी श्रमशक्तीच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविले जातात. आपत्ती व्यवस्थापनविषयक मार्गदर्शन, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, रक्तदान, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसदर्भात मानसिक परिवर्तनाबाबत उपाययोजना, जलसंवर्धन, गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियान, व्यक्तिमत्त्व विकास, महिला विकास, आदिवासी विकास, एड्स जनजागृती, बेरोजगार युवक स्वयंरोजगार कार्यशाळा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, इत्यादी कार्यक्रम रासेयोमार्फत राबविण्यात येतात. याशिवाय रासेयो शिबिरांतून ग्रामस्वच्छता, बंधाऱ्यांची निर्मिती, शेततळ्यांची उभारणी, रस्ते-बांधणी, रस्ते-दुरुस्ती, शोषखड्ड्यांची निर्मिती, इत्यादी उपक्रम पार पाडण्यात येतात. यावर्षी नांदेड येथे संपन्न झालेले आंतर विद्यापीठ आव्हान २०१३ हे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर, पुणे येथील उत्कर्ष २०१३ स्पर्धा, आसाममधील तेजपूर येथे संपन्न झालेले रासेयो शिबिर, राज्यस्तरीय तसेच पूर्व प्रजासत्ताक दिन निवड चाचणी शिबिर, राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन शिबिर, चिखलदरा येथील राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिर, इत्यादींमधून रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला.

विविध कला व क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली आहे. सत्र २०१३-१४मध्ये डिग्री कॉलेज ऑफ एज्युकेशन, अमरावती, येथे दि. २५ ते २८ सप्टेंबर २०१३ या कालावधीत आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. याद्वारे विद्यार्थ्यांमधील विविध कलागुणांना वाव देणाच्या प्रयत्न झाला. वारंगल येथे संपन्न झालेल्या मध्य विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेत विद्यापीठाची चमू सहभागी झाली. यातील भारतीय समूहगान, तालवाद्य संगीत, सुगम संगीत सोलो, लोकनृत्य या स्पर्धाप्रकारांत विद्यापीठास

प्रथम स्थान प्राप्त झाले. याशिवाय महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ 'इंद्रधनुष्य' युवा महोत्सव २०१३ स्पर्धेत विद्यापीठाचा सहभाग राहिला. क्रीडास्पर्धांमध्ये 'अश्वमेध' ही महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा, तसेच ग्वाल्हेर, भुवनेश्वर, रायपूर येथे संपन्न झालेल्या मध्य विभाग आंतर विद्यापीठ स्पर्धेत अनुक्रमे फुटबॉल, बॅडमिंटन व खो-खो, टेबल टेनिस या क्रीडाप्रकारांतून विद्यापीठ चमूचा सहभाग राहिला. खो-खोच्या चमूने मध्य विभाग आंतर विद्यापीठ स्पर्धेत प्रथम स्थान पटकावले. बॅडमिंटन, फुटबॉल, खो-खो, टेबल-टेनिस या खेळांच्या विद्यापीठाच्या चमू अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरल्या.

याचबरोबर विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर विभागांतून विद्यार्थी नेट-सेट, गेट, पॅट इत्यादी परीक्षांतून नेत्रदीपक यश संपादन करीत आहेत. काही विभागांतील विद्यार्थी गुणवत्ता यादीत स्थान पटकावीत आहेत. ही कौतुकास्पद बाब आहे.

विद्यापीठातील रोजगार व स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्राद्वारे जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना रोजगार मिळण्याच्यादृष्टीने आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहोत.

विद्यापीठ ग्रंथालयाच्या माध्यमातून विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ग्रंथालयात यु.जी. सी. इन्फोनेट कन्सोर्शियासह विविध डेटाबेसेसच्या माध्यमातून पंधरा हजारावर इ-जर्नल्स, इ-बुक्स वाचकांकरिता ग्रंथालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर संकेतस्थळाचा वाचकांद्वारे मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. भारतातील विविध विद्यापीठांद्वारे स्वीकारण्यात आलेल्या शोधप्रबंधांचा फुल टेक्स्ट डेटाबेस INFLIBNET द्वारे 'शोधगंगा' नावाने विकसित करण्यात आलेला आहे. आतापर्यंत विद्यापीठाने स्वीकारलेल्या १२७ शोधप्रबंधांचा 'शोधगंगा'मध्ये समावेश करण्यात आला आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील युजीसी-ॲकॅडेमिक स्टाफ कॉलेजमार्फत यावर्षी चार उद्‌बोधन वर्ग, दहा उजळणी वर्ग, दोन अल्पमुदतीचे वर्ग (शॉर्ट टर्म कोर्सेस) आयोजित करण्यात आले.

विद्यापीठाच्या या वाटचालीत आमच्यासमोर काही अडचणी यक्षप्रश्न म्हणून उभ्या आहेत. विद्यापीठाचा कार्यभार लक्षात घेता उपलब्ध असलेले मनुष्यबळ अत्यल्प आहे. त्यात वेळोवेळी निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची भर पडत राहते. शासनाकडून आवश्यक पदे मिळविण्याचा आमचा प्रयत्न सुरू असून त्यासाठी विद्यापीठामार्फत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्यात ५४९ शिक्षकेतर पदांची मागणी करण्यात आली आहे. विविध अडचणींतही शिक्षक,

अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी व विविध प्राधिकारणांच्या अथक परिश्रमाने व सहकार्याने विद्यापीठ सातत्याने प्रगतीपथाकडे वाटचाल करीत आहे.

विद्यार्थी मित्रांनो, आता काही महत्त्वाच्या मुद्यांबाबत मी आपणापुढे विचार ठेवतो :

१) स्वामी विवेकानंद यांची दिडशेवी जयंती भारतभर सर्वत्र साजरी झाली. स्वामी विवेकानंदांच्या वचनांची मी आपणास आठवण करून देऊ इच्छितो. स्वामीजी म्हणत,

> "बल हेच जीवन होय. दुर्बलता म्हणजे मृत्यू."
>
> "शारीरिक, बौद्धिक व आत्मिक दुर्बलता उत्पन्न करणारे जे जे काही असेल त्याचा विषाप्रमाणे त्याग करा."
>
> "ज्या व्यक्तीच्या ठायी आत्मविश्वास होता, त्याच महान व शक्तिशाली बनल्या."

स्वामीजींच्या संदेशाप्रमाणे तरुणांनी आत्मविश्वास बाळगून कार्य केले तर खरोखरच भारत वेगाने पुढे जाऊ शकेल.

२) तरुणांनी न्यूनगंड झटकून टाकावा. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना हे सांगण्याची नितांत आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनो न्यूनगंड बाळगू नका. ज्ञानाची साधना करा. बुद्धिमत्ता असेल, गुणवत्ता असेल तर जगात तुम्हाला कोणीही रोखू शकणार नाही. बुद्धी आणि ज्ञानाला कष्टाची जोड द्या. येणारा काळ तुमचाच आहे.

३) मित्रहो, पूर्वी बुद्धिजीवी माणसं समाजात श्रेष्ठ मानली जात असत. परंतु आज चित्र बदललेलं आहे. आजच्या काळात समाजात बुद्धिवंतांची कदर नसल्याचे चित्र पुढे येत आहे. ही परिस्थिती वाईट आहे. आणि ती बदलणं गरजेचं आहे. समाजात बुद्धिवंतांचा आदर वाढला पाहिजे.

४) ज्ञानाधिष्ठित समाजाची निर्मिती झाली पाहिजे. गाडगे बाबांनी कीर्तनाच्या माध्यमातून अंधश्रद्धा, वाईट रूढी-प्रथांमधून समाजाला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. आज शिक्षण देणारी केंद्रे उपलब्ध आहेत. या केंद्रांतून समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत ज्ञान-विज्ञान पोचले पाहिजे. तरच हा देश अंधश्रद्धेच्या विळख्यातून बाहेर पडू शकेल.

५) सध्याच्या ज्ञानविज्ञानाच्या काळात सर्वत्र वेगाने बदल घडत चालले आहेत. शिक्षणाच्या क्षेत्रातही नवनव्या संकल्पना पुढे येत आहेत. शिक्षण ही निरंतर सुरू राहणारी प्रक्रिया आहे. आज शिक्षणात 'थ्री ए'ची संकल्पना येऊ पहात आहे. कोणताही व्यक्ती, कुठेही आणि

कोणत्याही क्षणी (Any Body, Any Where, Any Time) शिक्षण घेऊ शकेल अशी स्थिती इंटरनेटमुळे शक्य झाली आहे. इंटरनेटवर माहितीचा प्रचंड साठा आहे. परंतु ह्या माहितीचे ज्ञानात रूपांतर होण्यासाठी शिक्षकांची खरी गरज आहे. म्हणून शिक्षकांना पर्याय असूच शकणार नाही. शिक्षणात 'ह्युमन टच' मोलाचा ठरतो. संगणक-इंटरनेटमधून 'ह्यूमन टच' मिळत नसल्याने शिक्षणप्रक्रियेत ते शिक्षकाला पर्याय ठरू शकत नाही. तेव्हा विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे महत्त्व जाणून नव्या-जुन्याचा मेळ घालून प्रगती केली पाहिजे.

६) २०१३ हे वर्ष विदर्भातील नेते व महाराष्ट्र राज्याचे तिसरे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष होते. तब्बल बारा वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिलेल्या वसंतराव नाईक यांनी त्यांच्या कारकिर्दीत कृषिविकासाला अधिक महत्त्व दिले होते. अन्नधान्याचा बाबतीत महाराष्ट्र स्वयंपूर्ण कसा होईल, याकरिता त्यांनी आपले जीवन वेचले. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आपल्या उपयोजित विज्ञानांनी कृषिक्षेत्राकडे आपले लक्ष वळविल्यास ते देशाच्या प्रगतीसाठी उपकारक ठरेल.

सरतेशेवटी, पन्नास वर्षांपेक्षा जास्त काळ लोकशाही पद्धतीने वाटचाल करणाऱ्या आपल्या भारत देशाला मजबूत करण्यासाठी आपण सारे संकल्प करू या. त्यासाठी आपले थोर राष्ट्रपुरुष, महान संत, समाजसुधारक, शास्त्रज्ञ, विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ या साऱ्यांपासून प्रेरणा घेऊन कार्य करू या. आपल्या राष्ट्राचे भविष्य उज्ज्वल बनवू या.

साने गुरुजींच्या शब्दांनुसार,

**"बलसागर भारत होवो,**
**विश्वात शोभुनी राहो ।"**

पुन्हा एकदा सर्वांचे स्वागत करतो तसेच पदवी, पदके व पारितोषिके प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

**धन्यवाद !**

**जय हिंद, जय महाराष्ट्र !**